# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

## भाषेतर विषय : भाग - १

## विषय : परिसर अभ्यास भाग - २

## इयत्ता ३ री ते ५ वी

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

## भाषेतर विषय : भाग - १

## इयत्ता ३ री ते ५ वी

## विषय : परिसर अभ्यास भाग - २

---

### अनुक्रमणिका


| अ. क्र. | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १४७ |
| २. | परिसर अभ्यास भाग : २ अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे –इयत्ता ३ री ते ५ वी | १४८ |
| ३. | अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे – इयत्ता तिसरी | १४९ |
| ४. | पाठ्यक्रम इयत्ता तिसरी | १५० |
| ५. | अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे – इयत्ता चौथी | १५३ |
| ६. | पाठ्यक्रम इयत्ता चौथी | १५४ |
| ७. | अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे – इयत्ता पाचवी | १५८ |
| ८. | पाठ्यक्रम इयत्ता पाचवी | १५९ |
| ९. | मूल्यमापन निर्देश | १६१ |

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२

## इयत्ता ३ री ते ५ वी

## विषय - परिसर अभ्यास भाग - २

**प्रस्तावना**

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ ची रचना करताना अभ्यासाचे ओझे कमी करण्याचा मुद्दा डोळ्यांसमोर ठेवण्यात आला. याचा एक भाग म्हणून काही विषय एकत्र करून त्यातील आशयाची एकात्मरीतीने मांडणी करण्याचे धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणानुसार इ. १ ली व २ रीमध्ये परिसरअभ्यास या विषयातील आशय मातृभाषा व गणित या विषयांमध्ये समाविष्ट करण्यात आला. तसेच इ. ३ री ते ५ वी या स्तरावर विज्ञान, इतिहास, भूगोल व नागरिकशास्त्र या पूर्वीच्या अभ्यासक्रमातील विषयांमधील आशयाची एकात्म मांडणी 'परिसर अभ्यास' या शीर्षकाखाली करण्यात आली. परिसर अभ्यासाचे भाग १ व भाग २ असे दोन भाग करून पहिल्या भागात विज्ञान, भूगोल, नागरिकशास्त्र या विषयांतील आशयाची एकत्र गुंफण करण्यात आली व भाग २ मध्ये घटनेतील मूल्ये अधिक जाणीवपूर्वक रुजविणे व राज्याच्या स्थानिक इतिहासाला यथायोग्य स्थान देणे या कारणासाठी 'इतिहास' या विषयाच्या आशयाची मांडणी स्वतंत्रपणे करण्यात आली.

इयत्ता तिसरीच्या टप्प्यावर अभ्यासक्रम तयार करत असताना इयत्ता तिसरीचा अभ्यासक्रम पूर्णपणे बदलण्यात आला आहे. पूर्वी 'माणसाची गोष्ट' हा भाग ३री ला होता, नव्या अभ्यासक्रमानुसार तिसरीच्या टप्प्यावर काळाची समज, कुटुंबाचा इतिहास, शाळा, गाव, शहर, व्यवसाय, गाव, तालुका, जिल्हा या घटकांचा अभ्यासक्रमात समावेश केलेला आहे.

इयत्ता तिसरीच्या टप्प्यावर 'काळाची समज' हा भाग पुढील इतिहासाची समज निर्माण व्हावी म्हणून घेतलेला आहे. विद्यार्थ्यांचा जगाशी संबंध सर्वप्रथम कुटुंब व नंतर शाळेच्या माध्यमातून येतो. कुटुंब आणि शाळेच्या माध्यमातून तो इतिहासाशी जोडला जातो. विद्यार्थ्यांच्या समोर गाव व शहर पातळीवरील वास्तव यावे म्हणून हा भाग अभ्यासक्रमात मुद्दाम समाविष्ट केलेला आहे. हस्तोद्योग व कुटिरोद्योग यांचा समावेश अभ्यासक्रमात करण्याचे कारण याद्वारे श्रमप्रतिष्ठेला प्राधान्य द्यायचे आहे. त्यांची माहिती व कल्पना नव्या पिढीला असावी म्हणून हा भाग अभ्यासक्रमात समाविष्ट केलेला आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा जीवन परिचय इयत्ता चौथीला करून दिलेला आहे. त्यांची प्रेरणा मध्ययुगाला कशी तारक ठरली याचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. एक व्यक्ती स्वयंप्रेरणेने राष्ट्राला कशी मार्गदर्शक ठरू शकते याचे प्रत्यक्ष उदाहरण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून विद्यार्थ्यांसमोर उभे केले आहे.

इयत्ता पाचवीच्या टप्प्यावर इतिहासाची आवश्यकता, कालगणना, मानवी उत्क्रांतीचे टप्पे, भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे, संस्कृतीकडे असा अभ्यासक्रम तयार केलेला आहे.

प्रत्येक सत्रादरम्यान आकारिक पद्धतीने व सत्राच्या अखेरीस संकलित स्वरूपात मूल्यमापन केले जाते. याच पद्धतीचा अंगीकार नवीन अभ्यासक्रमात केलेला आहे.

◎◎◎

# परिसर अभ्यास भाग–२
# अभ्यासक्रमाची सर्वसाधारण उद्‌दिष्टे

१) प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंतची समाजाच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे.

२) मानवाची उत्क्रांती, संस्कृतीचा विकास व समाज कल्याणासाठी भूतकाळ व वर्तमानकाळात विविध व्यक्तींनी दिलेल्या योगदानाची कदर करण्याची वृत्ती जोपासणे.

३) धर्मसहिष्णुता, सामाजिक सुसंवाद व समता या जाणिवा विकसित करणे.

४) जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी व निर्मितीक्षमता जोपासणे.

५) विद्यार्थ्यांना मानव, समाज आणि पर्यावरण यांच्या परस्परावलंबित्वाची प्रक्रिया समजावून देऊन पर्यावरणाचे संरक्षण करण्यास प्रवृत्त करणे.

६) ऐतिहासिक अवशेष, साधने, स्मारके आणि वास्तू यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

७) भारतीय समाजाच्या विकासातील विविध टप्प्यांविषयी माहिती करून घेण्यास मदत करणे.

८) ऐतिहासिक संदर्भात भारतीय समाजाच्या समकालीन समस्यांचा भूतकाळातील घटनांशी योग्य मेळ घालण्याची क्षमता निर्माण करणे व समस्या निराकरणासाठी विद्यार्थ्यास सक्षम करणे.

९) भारताची एकता व अखंडता याबद्‌दल विद्यार्थ्यांच्या मनात आदराची भावना निर्माण करणे.

१०) समाजातील दुर्बल घटक व महिला यांच्या सबलीकरणाची जाणीव निर्माण करणे.

११) वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

१२) अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रद्‌धा यांचा त्याग करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

१३) भारतीय संविधानात नमूद केलेली लोकशाही, समाजवाद व धर्मनिरपेक्षता ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनात बिंबविणे.

१४) 'समृद्‌ध वारशाचे जतन, पण हीन असेल त्याचा त्याग' – ही दृष्टी विकसित करणे.

१५) ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे.

१६) श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे.

१७) विविध कलागुणांची जोपासना करणे.

१८) आपत्ती व्यवस्थापनाबाबत जाणीव जागृती करणे.

१९) स्त्री–पुरुष समानतेच्या संदर्भात जागृती करणे.

# परिसर अभ्यास भाग-२
# अभ्यासक्रमाची उद्‌दिष्टे - इयत्ता ३ री

१) प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंतच्या समाज आणि संस्कृतीच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे.

२) जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी व निर्मितीक्षमता जोपासणे.

३) कुटुंबाचा व समाजाचा एक घटक या नात्याने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्याची जाणीव निर्माण करणे.

४) कुटुंब व परिसरातील व्यक्तींशी सहकार्य करण्याची वृत्ती जोपासणे.

५) वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

६) सर्व धर्मांचा आदर करण्याची, सामाजिक सलोखा राखण्याची व सुसंवाद वाढविण्याची प्रवृत्ती विकसित करणे.

७) घरातील व परिसरातील विविध उपक्रमांतील सहभागाचा आनंद लुटण्याची वृत्ती निर्माण करणे.

८) समाजहितासाठी असलेल्या नियमांचा आदर करून त्यांचे पालन करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

९) श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे.

# पाठ्यक्रम
## परिसर अभ्यास भाग–२

इयत्ता : ३ री

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| १. | **काळाची समज** | • आज, काल, उद्या यांची समज<br>• भूतकाळाचा वर्तमान व भविष्यावर होणारा परिणाम | • काळाची संकल्पना – फरक<br>• भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांतील परस्परसंबंध | • विद्यार्थी कालगणना समजावून घेतो.<br>• विद्यार्थी भूतकाळात घडलेल्या घटनांचा अन्वयार्थ लावतो. | • विद्यार्थी काल, आज, उद्या यातील फरक स्पष्ट करतो.<br>• काळाचा एकमेकाशी असणारा सहसंबंध सांगतो. |
| २. | **कुटुंबाचा इतिहास** | • वंशावळ<br>• आई व वडील दोन्हींकडील नातेसंबंध<br>• कुटुंबात साजरे होणारे सण व उत्सव | • वंशावळ<br>• नातेसंबंध–आजी–आजोबा, काका, मामा इत्यादी.<br>• काळानुरूप कुटुंबसंस्थेत झालेले बदल<br>• सण व उत्सव साजरे करण्यामागील भूमिका | • परस्पर संपर्काने मानवाचे अनुभवविश्व अधिकाधिक विस्तारले जाते.<br>• व्यक्तिमत्त्वाच्या विकासातील कुटुंबाचे स्थान महत्त्वाचे असते. | • विद्यार्थी कुटुंबातील नातेसंबंध सांगतो.<br>• विद्यार्थी विविध सण व उत्सवांचे महत्त्व स्पष्ट करतो. |
| ३. | **शाळा** | • माझी शाळा<br>• मित्रमैत्रिणी<br>• शाळेतील आवश्यक सुविधा उपक्रम इत्यादी.<br>**(संदर्भ: माझी समृद्ध शाळा)**<br>(शाळेतील सुविधा व सहशालेय व अभ्यासपूरक उपक्रम यांची माहिती देणे अभिप्रेत आहे.) | • माझी शाळा<br>• शाळेतील मित्रमैत्रिणी<br>• शालेय जीवनाचे महत्त्व | • शाळा सामाजिक जीवनाची पहिली पायरी असते.<br>• शाळेमुळे मानवी जीवन प्रगल्भ होते. | • विद्यार्थी शाळेबद्दल माहिती संकलित करतो व स्पष्ट करतो.<br>• विद्यार्थी शाळेच्या स्वच्छते–विषयी जागरूक राहतो.<br>• विद्यार्थी शाळेत राबवले जाणारे विविध उपक्रम व शाळेतील सुविधा विशद करतो.<br>• विद्यार्थी सहाध्यायांशी सहानुभावाने वागतो. |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| ४. | गाव/ शहर | • गावाची व शहराची ओळख<br>• गावातील व शहरातील सुविधा व सुखसोयी<br>• गावचा बाजार जत्रा/उरूस सण व उत्सव<br>• भाषा व बोलीभाषा | • गाव व शहर यांची संक्षिप्त माहिती<br>• गावातील, शहरातील सुविधा बँक, पोस्ट, सहकारी संस्था<br>• गाव, शहर–स्थानिक शासन संस्था<br>• गावचा बाजार<br>• गावातील, शहरांतील उत्सव, परंपरा, जत्रा, उरूस, सण<br>• बोलीभाषा | • मानवाच्या गरजा पूर्ण होण्यासाठी संघटित जीवनाची आवश्यकता असते.<br>• नागरी सुविधांमुळे आपले जीवन सुखावह होते.<br>• नागरी सुविधा सर्वांसाठी असतात. | • विद्यार्थी गाव व शहर यातील भेद सांगतो व सुविधांचे वर्गीकरण करतो.<br>• स्थानिक सुखसोयी व सुविधा यांचे महत्त्व स्पष्ट करतो.<br>• जत्रा, उत्सव, उरूस यांचे महत्त्व सांगतो.<br>• मानवी जीवनातील भाषेचे महत्त्व सांगतो. |
| ५. | व्यवसाय | • हस्तोउद्योग<br>• कुटिरोद्योग<br>• मुख्य व्यवसाय–शेती<br>• उद्योगधंदे व कारखाने | • गावातील हस्तोद्योगांची माहिती व महत्त्व<br>• कुटिरोद्योगांची माहिती व महत्त्व<br>• शेतीचे महत्त्व व शेतीला पूरक उद्योग<br>• परिसरातील उद्योगधंदे व कारखाने<br>• एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमण | • व्यवसाय व उद्योगधंदे यामुळे गाव संपन्न होते. | • विद्यार्थी परिसरातील विविध व्यवसायांबाबतची माहिती मिळवतो.<br>• विद्यार्थी हस्तोउद्योग व कुटिरोद्योग यांतील फरक सांगतो.<br>• विद्यार्थी शेतीचे महत्त्व सांगतो.<br>• विविध उद्योगांचे वर्गीकरण करतो. |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| ६. | **गाव, तालुका आणि जिल्हा** | • ऐतिहासिक ओळख<br>• ऐतिहासिक वारशाचे जतन | • भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील सहभागी व्यक्ती<br>• परिसरातील स्मारके, किल्ले, लेणी, वास्तू, जलाशय इत्यादी.<br>• धार्मिक स्थळे<br>• संग्रहालये | • आपल्या पूर्वजांनी केलेल्या कामगिरीमुळे त्यांच्याविषयी आदराची भावना निर्माण होते. | • विद्यार्थी देशभक्तांविषयी आदर बाळगतो.<br>• विद्यार्थी परिसरातील ऐतिहासिक व धार्मिक स्थळांची माहिती सांगतो.<br>• विद्यार्थी ऐतिहासिक स्थळांची नासधूस होणार नाही याची काळजी घेतो. |

# परिसर अभ्यास भाग-२
# अभ्यासक्रमाची उद्दिष्टे - इयत्ता ४ थी

## उद्दिष्टे

१) प्राचीन काळापासून वर्तमानकाळापर्यंतची समाजाच्या विकासाची प्रक्रिया समजावून घेणे.

२) धर्मसहिष्णुता, सामाजिक सुसंवाद व समता या जाणिवा विकसित करणे.

३) समाजहितासाठी असलेल्या नियमांचा आदर करून त्यांचे पालन करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

४) ऐतिहासिक वास्तूंच्या जतनाची आवश्यकता पटवून देऊन त्यांचे जतन करण्याबाबत जाणीव निर्माण करणे.

५) अनिष्ट रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांचा त्याग करण्याची वृत्ती वाढीस लावणे.

६) जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी व निर्मितीक्षमता जोपासणे व त्यांच्या अभिव्यक्तीला वाव देणे.

७) राजसत्तेच्या माध्यमातूनही प्रजेचे हित साधणाऱ्या काही ऐतिहासिक स्त्री-पुरुषांच्या योगदानाची माहिती करून घेणे.

८) पर्यावरण रक्षण व संवर्धनाची जाणीव निर्माण करणे.

९) आपत्ती व्यवस्थापनाबाबत जाणीव जागृती करणे.

◎◎◎

# पाठ्यक्रम

## परिसर अभ्यास भाग–२

इयत्ता : ४ थी

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| १. | **मध्ययुगीन समाज जीवन** | • समाजाची दुरवस्था, अस्थिरता व अधोगती<br>• राजेशाही, काही चांगले राज्यकर्ते (उदा. भारतातील अकबर बादशाह, छत्रपती शिवाजीमहाराज) | • मध्ययुगातील राजे<br>• महाराष्ट्रावर राज्य करणाऱ्या सत्ता<br>• रयतेची स्थिती | • इतिहासाच्या प्रगतीच्या बाबतीत चढउतार आढळून येतात.<br>• जे राज्यकर्ते लोककल्याणासाठी सत्तेचा वापर करतात ते थोर म्हणून गणले जातात. | • प्राचीन संस्कृतीच्या विनाशानंतर मध्ययुगीन समाजजीवनात अस्थिरता निर्माण झाली. प्रगती थंडावली आणि समाजाची दुरवस्था का झाली हे विद्यार्थी सांगतो.<br>• अनेक बाबतीत जनतेची दुरवस्था झाली तरी काही राजे मात्र प्रजेच्या कल्याणासाठी राज्य करत होते हे विद्यार्थी सांगतो. |
| २. | **शिवपूर्व–काल** | • शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र<br>• संतांची शिकवण | • शिवजन्मापूर्वी महाराष्ट्रावर राज्य करत असलेल्या सत्तांबद्दल माहिती<br>• शिवजन्मापूर्वीची महाराष्ट्रातील रयतेची स्थिती<br>• श्री चक्रधर स्वामी यांचे कार्य<br>• संत ज्ञानेश्वर यांचे कार्य<br>• संत तुकाराम यांचे कार्य | • लोकल्याणासाठी लोकाभिमुख सत्तेची आवश्यकता असते.<br>• समता, एकता व सामूहिक चळवळी स्वातंत्र्यासाठी आवश्यक असतात.<br>• संतांची शिकवण सामाजिक व राजकीय जागृतीस उपयुक्त ठरू शकते. | • शिवजन्मापूर्वीच्या महाराष्ट्रातील परिस्थितीची माहिती विद्यार्थी करून घेतो.<br>• मराठा सरदारांनी केलेली कामगिरी विद्यार्थी सांगतो.<br>• संतांच्या शिकवणुकीचे परिणाम सांगतो. |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| | | • मराठा सरदारांची कामगिरी | • समर्थ रामदास यांचे कार्य<br>• धामधुमीचा काळ<br>• शूर मराठे सरदार<br>• शौर्याची परंपरा<br>• घृष्णेश्वर मंदिर<br>• वेरूळचे भोसले | • स्वकर्तृत्वाने प्रगती करता येते. | • विद्यार्थी तत्कालीन महाराष्ट्रातील प्रमुख घराणी सांगतो.<br>• विद्यार्थी शहाजीराजांच्या कर्तृत्वाबद्दल आदर बाळगतो. |
| ३. | **शिवरायांचे बालपण** | • शिक्षण<br>• स्वराज्याची स्थापना | • शिवजन्म व शिवरायांचे बालपण<br>• शिवरायांच्या शिक्षणास प्रारंभ<br>• स्वराज्याची शपथ<br>• मावळ खोऱ्यातील जमवाजमव<br>• शिवरायांची राजमुद्रा | • संस्कारांमुळे व्यक्तिमत्त्व समृद्ध होते.<br>• जनसामान्यांच्या सहभागामुळे स्वराज्यनिर्मितीसारखी महान कार्ये शक्य होतात.<br>• शिक्षणातून व्यक्तिमत्त्व घडत जाते.<br>• ध्येय निश्चित करून निश्चयाने वाटचाल केल्यास ध्येय साध्य होते. | • शिवरायांच्या बालपणाविषयी व शिक्षणाविषयी विद्यार्थी माहिती करून घेतो.<br>• स्वराज्य स्थापनेविषयी विद्यार्थी माहिती सांगतो<br>• विद्यार्थी शिवरायांच्या राजमुद्रेचा अर्थ स्पष्ट करतो.<br>• विद्यार्थी शिवाजी महाराजांचे वतनविषयक धोरण स्पष्ट करतो. |
| ४. | **स्व–राज्याची वाटचाल** | • स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त<br>• आदिलशाहीशी संघर्ष (पन्हाळगडाचा वेढा व पन्हाळगडावरील पराक्रम) | • स्वकीय शत्रूंवर जरब बसविली (निंबाळकर, मोहिते, घोरपडे, मोरे यांचा शिवरायांना विरोध)<br>• यशवंतराव मोरे यांना समज | • निश्चयापासून बळ निर्माण होते.<br>• भावनेपेक्षा कर्तव्य श्रेष्ठ असते. | • शिवरायांनी स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त कसा केला हे विद्यार्थी सांगतो.<br>• विविध अडचणींवर मात करून शिवरायांनी स्वराज्याची |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निर्दशक |
|---|---|---|---|---|---|
| | | • मुघलांशी संघर्ष | • जावळीवरील स्वारी व रायरीचा किल्ला<br>• आदिलशाही हादरली<br>• स्वराज्यावरील संकट<br>• अफजलखान भेट<br>• पन्हाळगडाचा वेढा<br>• शायिस्तेखानाची स्वारी<br>• पुरंदरचा तह<br>• आग्र्याहून सुटका<br>• सिंहगडावर ताबा<br>• सुरतेवरील स्वाऱ्या | • चातुर्य, धैर्य आणि विवेक यांच्यामुळे संकटांवर मात करता येते.<br>• स्वहितापेक्षा देशहित अधिक महत्त्वाचे असते. | वाटचाल कशी केली हे विद्यार्थी समजावून घेतो. |
| ५. | **शिव–राज्याभिषेक व त्या–नंतरची वाटचाल** | • राज्याभिषेक<br>• दक्षिण दिग्विजय<br>• छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू | • राज्याभिषेकाची आवश्यकता<br>• स्वराज्याची राजधानी<br>• राज्याभिषेक समारंभाची तयारी<br>• राज्याभिषेकाचा सोहळा<br>• दक्षिणेकडील मोहिमेचा बेत<br>• गोवळकोंड्याला भेट<br>• कुतुबशहाने केलेले स्वागत<br>• जिंजी जिंकली<br>• व्यंकोजी राजांची भेट<br>• रयतेचा वाली गेला | • राजसत्तेला लोकमान्यता आवश्यक असते.<br>• स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी दूरदृष्टी आवश्यक असते. | • विद्यार्थी शिवराज्याभिषेकाचा हेतू व त्याचे महत्त्व सांगतो.<br>• शिवरायांच्या दक्षिण दिग्विजयाची माहिती सांगतो. |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| ६. | **शिव–छत्रपतींची थोरवी** | • लोकहितकारी व कार्यक्षम राज्यव्यवस्था<br>• लष्करी नीती व लष्करी कामगिरी<br>• धर्मसहिष्णुता | • राजकारणाची घडी<br>• शिवाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ<br>• शिवाजी महाराजांची संरक्षण व मुलकी व्यवस्था<br>• शिवाजी महाराजांचे शौर्य व धैर्य | • उत्तम राज्यकर्त्याजवळ संघटन कौशल्य, नीतिमत्ता, धैर्य, मुत्सद्देगिरी, दूरदृष्टी व लोककल्याण यांचा समन्वय साधण्याची कुशलता असावी लागते. अशी व्यक्ती ऐतिहासिक विभूती ठरते. | • विद्यार्थी शिवरायांच्या राज्यव्यवस्थेची माहिती मिळवतो.<br>• विद्यार्थी शिवरायांची लष्करनीती व लष्करी कामगिरी यांची माहिती करून घेतो.<br>• विद्यार्थी शिवरायांचे धर्म–सहिष्णुतेचे धोरण स्पष्ट करून सांगतो. |
| ७. | **छत्रपती शिवाजी महा–राजांची प्रेरणा** | • मध्ययुगाकडून आधुनिक युगाकडे वाटचाल व त्या वाटचालीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव<br>• स्वातंत्र्याचे व लोककल्याणाचे महत्त्व | • रयतेचे कल्याण<br>• कडक शिस्त<br>• उदार धार्मिक धोरण<br>• स्फूर्तिदाता<br>• स्वदेशाभिमान व हिंदवी स्वराज्य<br>• शिवरायांचे आठवावे रूप | • शिवरायांसारख्या श्रेष्ठ राज्यकर्त्यापासून मिळणारी प्रेरणा सार्वकालीन असते. काही मध्ययुगीन प्रेरणा आधुनिकतेच्या उदयास पूरक ठरल्या. | • विद्यार्थी शिवाजी महाराजांची थोरवी सांगतो. |

# परिसर अभ्यास भाग-२
# अभ्यासक्रमाची उद्दिष्टे - इयत्ता ५ वी

## उद्दिष्टे

१. पर्यावरण संतुलन राखण्यासाठी निसर्गाशी सुसंवाद साधण्याची क्षमता विकसित करणे.

२. मानवी संस्कृतीच्या विकासाची प्रक्रिया जाणून घेणे.

३. जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी, व निर्मितीक्षमता जोपासणे.

४. वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे.

५. ऐतिहासिक संदर्भात भारतीय समाजाच्या समकालीन समस्यांचा भूतकाळातील घटनांशी योग्य मेळ घालण्याची क्षमता निर्माण करणे व समस्या निराकरण करण्याची वृत्ती निर्माण करणे.

६. विविध कलागुणांची जोपासना करणे.

७. श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे.

८. ऐतिहासिक माहिती मिळविण्यासाठी आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यास प्रवृत्त करणे.

९. इतिहास लेखन ही शास्त्रशुद्ध संकल्पना आहे ही जाणीव निर्माण करणे.

१०. इतिहास हा पुराव्यांवर आधारित असून त्याचा अन्वयार्थ लावणे महत्त्वाचे असते ही जाणीव निर्माण करणे.

११. साधनांच्या माध्यमातून इतिहास बोलका करणे आवश्यक आहे, याची जाणीव निर्माण करणे.

१२. दैनंदिन जीवनातील घडामोडी या उद्याच्या इतिहासाचा भाग असतात याची जाणीव निर्माण करणे.

१३. दैनंदिन जीवनातील घडामोडी लिहून ठेवणे आवश्यक आहे याची जाणीव निर्माण करणे.

◎◎◎

# पाठ्यक्रम

## परिसर अभ्यास भाग–२

इयत्ता – ५ वी

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| १. | **इतिहासाची आवश्यकता** | • इतिहास म्हणजे काय?<br>• इतिहासाची वैशिष्ट्ये<br>• इतिहासाची गरज व महत्त्व | • इतिहासाची संकल्पना<br>• ऐतिहासिक काळाची वैशिष्ट्ये<br>• ऐतिहासिक घटनांचे महत्त्व | • इतिहास हे एक शास्त्र असून ते स्थळ, काळ, व्यक्ती, समाज या अनुषंगाने सीमित आहे. | • विद्यार्थी इतिहास म्हणजे काय हे सांगतो.<br>• विद्यार्थी इतिहासाची गरज व महत्त्व विशद करतो. |
| २. | **कालगणना** | • कालरेषा<br>• इसवी सन पूर्व<br>• इसवी सन | • कालरेषा म्हणजे काय?<br>• कालगणना कशी केली जाते?<br>• प्रमुख कालमापन पद्धतींची तोंड ओळख. | • भूतकाळाच्या शास्त्रीय अभ्यासासाठी कालगणना पद्धतींची आवश्यकता असते. | • कालमापन कसे केले जाते हे विद्यार्थी सांगतो.<br>• विद्यार्थी इ.स.पू. व इ. स. यांतील फरक स्पष्ट करतो.<br>• विद्यार्थी इ.स.पू. व इ.स. या संज्ञांचा योग्य वापर करतो. |
| ३. | **मानवी उत्क्रांतीचे टप्पे** | • उत्क्रांतीची संकल्पना<br>• जीवसृष्टीची उत्क्रांती व विकास (एकपेशीय जीवांपासून मानवापर्यंत)<br>• अश्मयुगीन मानव | • उत्क्रांती म्हणजे काय?<br>• उत्क्रांतीचे टप्पे<br>• अश्मयुगीन मानव – भटके जीवन, अन्नशोध, शिकारीची अवजारे | • संस्कृतीच्या आरंभापासून मानव आणि निसर्ग यांचे दृढ नाते निर्माण झाले.<br>• मानव आपली प्रगती घडवून आणण्यासाठी निसर्गातून ज्ञान मिळवितो. | • विद्यार्थी मानवी उत्क्रांतीचे टप्पे सांगतो.<br>• विद्यार्थी जीवसृष्टीची उत्क्रांती व विकास यांची माहिती सांगतो.<br>• विद्यार्थी उत्क्रांतीचा अर्थ सांगतो. |

| अ.क्र. | घटक | उपघटक | व्याप्ती आणि मर्यादा | प्रमुख जाणिवा | अध्ययन निदर्शक |
|---|---|---|---|---|---|
| ४. | **भटक्या जीवना-कडून स्थिर जीवनाकडे** | • भटके जीवन<br>• हत्यारे, अवजारे<br>• अग्नीचा शोध व उपयोग<br>• चाकाचा शोध<br>• पशुपालन<br>• टोळ्या आणि कुटुंब<br>• श्रद्धा व परंपरा<br>• सामाजिक नियम<br>• चित्रलिपी व अभिव्यक्ती | • मानवाच्या हत्यारांमध्ये व अवजारांमध्ये कसे बदल होत गेले (दगडाची हत्यारे, धातूची हत्यारे इ.)<br>• शेती व पशुपालनाने अश्मयुगीन मानवाचे जीवन कसे स्थिर होत गेले?<br>• कुटुंबसंस्थेचा उदय कसा झाला?<br>• तत्कालीन सामाजिक जीवन, अन्न, वस्त्र, श्रद्धा, परंपरा, सामाजिक नियम इ.<br>• चित्रलिपी | • शेती हा मानवाचा प्रमुख व्यवसाय बनला.<br>• चाकाचा व अग्नीचा शोध मानवी जीवनाच्या विकासास कारणीभूत ठरले.<br>• शेतीच्या शोधामुळे मानवी जीवन स्थिर झाले. | • विद्यार्थी इतिहासपूर्वकालीन मानवाचे जीवन स्पष्ट करतो.<br>• विद्यार्थी शेती व पशुपालनामुळे मानवाचे जीवन कसे स्थिर होत गेले हे स्पष्ट करतो. |
| ५. | **संस्कृती म्हणजे काय? (मानवाच्या गरज पूर्ती-तील साम्य आणि विविधता)** | • संस्कृती म्हणजे काय?<br>• संस्कृतीचे घटक-अन्न, मानवनिर्मित साधने, वस्त्र, भाषा, परंपरा, चालीरिती, सामाजिक नियम, सण व उत्सव लोकनृत्ये इत्यादी. | • भौगोलिक विविधतेचा सांस्कृतिक घटकांवर कसा परिणाम होतो व विविध संस्कृतींमधे कसा फरक पडत जातो हे उदाहरणांच्या साहाय्याने थोडक्यात स्पष्ट करणे. (भारत व महाराष्ट्र) | • मानवी संस्कृती विकसनशील आहे. | • विद्यार्थी संस्कृतीच्या विविध घटकांची माहिती सांगतो. |

# मूल्यमापनासंदर्भातील निर्देश

इतिहास व नागरिकशास्त्र या विषयांचे मूल्यमापन दि. २० ऑगस्ट २०१२ च्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन विषयीच्या शासननिर्णयानुसार करावयाचे आहे.

१) मूल्यमापनात उपक्रम, प्रकल्प यांचा समावेश भरपूर प्रमाणात असावा.

२) स्वयंअध्ययनाचे प्रश्न घटक पूर्ण झाल्यावर न देता उपघटकानंतर द्यावे.

३) मूल्यमापनात वस्तुनिष्ठ प्रश्नांचा वापर अधिक प्रमाणात करावा. आकलनावर भर देणारे वस्तुनिष्ठ प्रश्न असावे.

४) स्वतःच्या मताने (विचारपूर्वक) उत्तरे देण्यासंबंधी दीर्घोत्तरी स्वरूपाचे प्रश्नही भरपूर असावेत.

५) कल्पनांना व विचारांना चालना देणाऱ्या प्रश्नांचा समावेश पाठ्यपुस्तकात असावा.
(पुढे काय होईल? हे असे असते तर ....? इ. प्रकारचे प्रश्न.)

६) इ.स, स्थळे–वस्तू, घटनाक्रम यांसंबंधी पाठांतरावर अधारित प्रश्न असू नयेत. परंतु या आशयावर आकलन, उपयोजन पातळीवरील प्रश्नांचा समावेश करण्यास हरकत नाही. चित्रांचे व नकाशांचे निरीक्षण करून लिहावे लागतील असे स्वाध्याय असावेत.

७) गटचर्चा, चर्चा यासंबधीने योग्य त्या घटकांचा निर्देश दिलेला असावा.

८) उपक्रम, कृती, प्रात्यक्षिकाचा समावेश असावा.

यापुढील तक्त्यात प्रत्येक घटकाच्या मूल्यमापनासाठी कोणती साधनतंत्रे वापरता येतील, कोणत्या कृती/उपक्रम इत्यादीतून हे मूल्यमापन करता येईल याची संक्षिप्त यादी दिली आहे. ती केवळ नमुन्यादाखल आहे. शिक्षकांना स्वतःच्या अनुभवाप्रमाणे व कल्पनेप्रमाणे साधने/उपक्रम निवडण्याचे स्वातंत्र्य आहे.

तक्त्यातील घटकनिहाय उपक्रम/कृती इत्यादी अध्ययन–अध्यापनासाठी उपयोगी आहे. तेच उपक्रम/कृती इत्यादी बदलाशिवाय किंवा समांतर उपक्रम/कृती इत्यादी तयार करून मूल्यमापनासाठी वापरता येतील. याखेरीज आपापल्या शाळातील उपक्रम/कृती यांच्या आधारेही मूल्यमापन करता येईल.

◎◎◎

# मूल्यमापन निर्देश
## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ३ री**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| १. | **काळाची समज** | • दिनदर्शिका तयार करणे.<br>• वर्तमानपत्र / पोस्टकार्ड जमविणे.<br>• सण/उत्सवांचा महिन्यानुसार क्रम लावणे.<br>• जुन्या नव्या खेळण्याचा क्रम लावणे.<br>• घरातील सर्व सदस्यांचे वाढदिवस असणारे इंग्रजी व मराठी महिने क्रमाने मांडणी करणे. | निरीक्षण<br>तोंडी काम<br>गटचर्चा<br>इतर |
| २. | **कुटुंबाचा इतिहास** | • वंशावळ तक्ता / नातेसंबंध तक्ता तयार करणे.<br>• आजी आजोबांच्या काळातील दागिने / वस्तू / भांडी पाहून त्यांची यादी करणे व चित्रे रेखाटणे. (काळानुरूप बदल नोंदविणे<br>उदा. भात शिजविण्यासाठी पूर्वी मडकी, पातेली. आता कुकर. पूर्वी चूल स्टोव्ह आता गॅस.)<br>• जत्रेतील दुकानदार, खेळ करणाऱ्या लोकांना शाळेत बोलावून चर्चा घडवून आणणे.<br>• पूर्वीच्या घरांचे स्वरूप व आजची घरे यात झालेल्या बदलांची चित्रे वा फोटो संकलित करणे. | तोंडी काम<br>प्रकल्प<br>उपक्रम<br>इतर |
| ३. | **शाळा** | • शाळेचे जुने फोटो दाखवून जुनी शाळा व नवी शाळा यातील बदलांवर गटचर्चा घडवून आणणे.<br>• शाळेत आतापर्यंत झालेल्या मुख्याध्यापकांच्या नावांची कार्यकाळानुसार यादी तयार करणे.<br>• शाळेतील पिण्याच्या पाण्याच्या जुन्या व नव्या सुविधा यातील फरकाबाबत वर्गात चर्चा घडवून आणणे. | प्रत्यक्ष अनुभव<br>उपक्रम<br>तोंडीकाम |

## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ३ री**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| ४. | गाव / शहर | • पोस्ट ऑफिस, जत्रा–यात्रा यांना भेटी देऊन अहवाल तयार करणे व वैशिष्ट्ये, सोयी/सुविधा यांची माहिती संकलित करणे.<br>• पोस्ट, बँक यांचे कार्य कसे चालते याचा अहवाल तयार करणे. | क्षेत्रभेट<br>चित्रफिती<br>ध्वनिमुद्रिका<br>उपक्रम<br>तोंडी काम<br>इतर |
| ५. | व्यवसाय | • गावातील व परिसरातील जुन्या इमारतींना भेट देऊन त्यांचा कालावधी व वैशिष्ट्ये इ. माहिती संकलित करणे.<br>• गावातील विविध व्यावसायिकांना भेटणे व पालकांच्या सहकार्याने माहिती घेणे. | मुलाखत<br>क्षेत्रभेट<br>सहल |
| ६. | गाव/ तालुका / जिल्हा | • गावातील व परिसरातील जुन्या इमारतींना भेट देऊन त्यांचा कालावधी व वैशिष्ट्ये इ. माहिती संकलित करणे. | स्वाध्याय व वर्गकार्य (स्वयंअध्ययनास चालना देण्यासाठी) |

## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ४ थी**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| १. | मध्ययुगीन समाज जीवन | • शिवपूर्वकालीन व आजच्या शिक्षणविषयक परिस्थितीचा संबंध यावर गटचर्चा व भूमिकापालन<br>• विद्यार्थ्यांना गावाच्या विकासासंबंधी माहितीचे संकलन करणे. | चर्चा/सादरीकरण<br>निरीक्षण<br>भूमिकापालन |
| २. | शिवपूर्वकाल | • पुस्तके/सी.डी.इ च्या आधारे संतांच्या वचनांचे संकलन | चर्चा/गटचर्चा |
| ३. | शिवरायांचे बालपण | • भूमिकाभिनय | चर्चा/गटचर्चा<br>भूमिकापालन |
| ४. | स्वराज्याची वाटचाल | • प्रसंगाचे नाट्यीकरण/उपक्रम/कृती<br>• विविध किल्ल्यांची चित्रे जमा करणे व माहिती कथन करणे.<br>• चित्रपट/चित्रफित/लोकगीत/ऐतिहासिक प्रसंगांचे वर्णन ऐकणे.<br>• नकाशावाचन किल्ल्यांची प्रतिकृती तयार करणे (प्रकल्प). | तोंडीकाम<br>प्रकल्प |
| ५. | शिवराज्याभिषेक व त्यानंतरची वाटचाल | • राज्याभिषेक प्रसंगावर नाट्यीकरण<br>• खेळ अभिरूपता<br>• नकाशा वाचन<br>• वर्गाचे मंत्रिमंडळ तयार करून विविध खात्यांची निर्मिती करणे<br>• शालेय मंत्रीमंडळावर चर्चा घडवून आणणे | तोंडीकाम<br>प्रकल्प<br>निरीक्षण |

## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ४ थी**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| ६. | **शिवछत्रपतींची थोरवी** | • राजमुद्रेच्या चित्राचे वाचन करून स्पष्टीकरण करणे.<br>• विविध देशांच्या नाण्यांचे संग्रह करणे.<br>• १० रु. च्या नोटेवरील मजकुराचे वाचन<br>• खातेनिहाय कामांची विभागणी करणे व जबाबदारी निश्चित करणे. | प्रकल्प<br>निरीक्षण<br>उपक्रम |
| ७. | **छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा** | • 'शिवाजी महाराजांची थोरवी' या विषयावर परिसंवाद | निरीक्षण<br>गटचर्चा |

## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ५ वी**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| १. | **इतिहासाची आवश्यकता** | • पोस्टाच्या जुन्या तिकिटांचा संग्रह करणे व त्याचा इतिहासाशी संबंध जोडणे.<br>• मागील वर्षीच्या स्नेहसंमेलनाचे/सहलीचे फोटो दाखवून या वर्षीच्या स्नेहसंमेलनाचे वा सहलीचे<br>• नियोजन कसे करता येईल याबद्दल चर्चा<br>• शाळेच्या इमारतीचे जुने व नवे फोटो यांच्या आधारे शाळेत झालेल्या बदलाबाबत चर्चा. | उपक्रम<br>गटचर्चा<br>प्रकल्प |
| २. | **कालगणना** | • दिनदर्शिका, पंचांग याद्वारे या वर्षात येणारे सण/समारंभ/उत्सव/शालेय कार्यक्रम (दिनांक, महिना, वार) केव्हा येतात याबद्दल चर्चा<br>• शाळेत होणारे सहशालेय कार्यक्रम व त्यांचा महिना याचे वेळापत्रक तयार करणे.<br>• इ. ५ वी मध्ये ठेऊन (pivot point) ५ वी च्या आधी व ५ वी च्या नंतर अशा पद्धतीने स्वतःच्या जीवनातील घटनांची कालरेषा तयार करणे. | गटचर्चा<br>उपक्रम |
| ३. | **इतिहासाची साधने** | • वर्तमानपत्रातील दिनविशेष सदराच्या कात्रणांच्या नोंदी ठेवण्यासाठी चिकटवही तयार करणे.<br>• भाषेच्या पुस्तकातील लेखकांची व कवींची माहिती (टोपण नाव, कवितासंग्रह, पुरस्कार इ.) संग्रहित करून कालानुक्रमे त्यांची यादी<br>• घरातील/परिसरातील कार्यक्रमांचे फोटो कालानुक्रमे चिकटविणे.<br>• गावातील जुन्या इमारती, वस्तुसंग्रहालये, प्रदर्शने यांना भेट देऊन माहिती जमविणे. | मुलाखत<br>निरीक्षण<br>तोंडीकाम<br>क्षेत्रभेटीचा वृत्तांत |
| ४. | **मानवी उत्क्रांतीचे टप्पे** | • सभोवतालच्या परिसरातील सजीवांचे निरीक्षण करून साम्य व फरक यांबाबत गटचर्चा घडवून आणणे.<br>• प्राणी संग्रहालयास भेट, चलचित्रफिती व चित्रांद्वारे माकड व मानव यांतील साधर्म्य व फरक यांची चर्चा घडविणे. | मुलाखत<br>निरीक्षण<br>तोंडीकाम<br>क्षेत्रभेटीचा वृत्तांत |

## आकारिक मूल्यमापन

**इयत्ता : ५ वी**

| अ.क्र. | घटक | उपक्रम/कृती/प्रकल्प/वर्गकार्य | मूल्यमापन |
|---|---|---|---|
| | | • पृथ्वीवर अस्तित्वात असणाऱ्या व नसणाऱ्या प्राण्यांची चित्रे एकत्र दाखवून अस्तित्वात असलेल्या व नसलेल्या प्राण्यांचे वर्गीकरण करणे.<br>• प्राचीन काळातील मानवाच्या व आधुनिक काळातील मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा अशा गरजांची चित्रे, चलचित्रपट माहितीपट याद्वारे फरक | |
| ५. | **भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे** | • राजा म्हणतो, समशेरा सारखा खेळ<br>• क्षेत्रभेट खोदकाम केलेली स्थळे (excavation sites)<br>• पथनाट्य<br>• वर्तमानपत्रातील इतिहास विषयक लेखांच्या कात्रणांचा संग्रह<br>• कारागिरांना आपल्या कलेचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यासाठी शाळेत आमंत्रित करणे/मुलाखत<br>• मुलाखत (मूर्तीकार, पाथरवट इ.)<br>• भूमिकापालन<br>• खजिन्याचा शोध (Treasure Hunt) यासारख्या खेळाचे वर्गात आयोजन करणे. | सहभागाचे निरीक्षण<br>उपक्रम<br>प्रकल्प<br>तोंडीकाम |
| ६. | **संस्कृती म्हणजे काय? (मानवाच्या गरजापूर्तीतील साम्य आणि विविधता)** | • वर्गात लोकनृत्य, विविध वेशभूषा अशा स्पर्धा घेणे.<br>• भौगोलिक विविधतेनुसार बदलणाऱ्या या सांस्कृतिक घटकांची (अन्न, वस्त्र, निवारा, चालीरिती,<br>• भाषा, सण, समारंभ, उत्सव, परंपरा इ.) माहिती संग्रहित करणे.<br>• मराठी विश्वकोश, विश्वकोश सी.डी. यांमधून विविध संस्कृतींची माहिती गोळा करणे. | निरीक्षण<br>उपक्रम<br>प्रकल्प |